# मुग्धा कर्णिक

# टिटू





# टिट्टू


डॉ. मुग्धा कर्णिक



ई साहित्य प्रतिष्ठान

# टिटू

## डॉ. मुग्धा कर्णिक

छायाचित्रे- मुग्धा व धनंजय कर्णिक

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.



# ई-प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

Whatsapp: **9987737237 (विनामूल्य पुस्तकांसाठी नाव गाव कळवा)**

प्रकाशन: ३० जून २०२२ (आंतरराष्ट्रीय महिला दिवस)

©esahity Pratishthan®2022

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.







लेखिकेचा परिचय

डॉ. मुग्धा कर्णिक

जन्म १९६०

शिक्षण एम् ए समाजशास्त्र

अनुवादशास्त्रात डॉक्टरेट

डॉ. मुग्धा कर्णिक या १९९१ पासून २०१८पर्यंत- संचालक- बहिःशाल शिक्षण विभाग, मुंबई विद्यापीठ होत्या. सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात मुंबई विद्यापीठाच्या बहिःशाल शिक्षण विभागाच्या संचालक म्हणून २७ वर्षे कार्यरत होते. २०१८ साली निवृत्त झाल्या.

या काळात त्यांनी कोकणच्या ग्रामीण जिल्ह्यांत २००२ पर्यंत विविध शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन केले

त्यांच्या राजकीय लिखाणामुळे त्या मराठी परिघात समाज माध्यमांतून प्रसिद्ध आहेत. गेली अनेक वर्षे वृत्तपत्रांतूनही सामाजिक-राजकीय लेखन केले आहे. अनेक अनुवाद केले आहेत.द कुकिंग विच या नावाने त्यांनी केलेले खाद्यपदार्थांच्या कृतीचे लेखनही लोकप्रिय आहे. शैक्षणिक शिबिरांचे डिझाइनिंग आणि अंमल. यात गणित, खगोलशास्त्र, वैद्यकशास्त्र, पोषणशास्त्र, जीवशास्त्रातील वनस्पती आणि प्राणीशास्त्रविषय, पर्यावरणशास्त्र, अंधश्रध्दा निर्मूलन, नाट्यप्रशिक्षण, कला या विषयांवरील कार्यक्रम सुमारे पन्नास गावांतून केले. त्याच वेळी मुंबई शहरात विविध खुल्या- विनाअट प्रमाणपत्र अभ्यासक्रमांची आखणी. इंडिया स्टडी सेंटर ट्रस्ट या शैक्षणिक ट्रस्टच्या त्या व्यवस्थापकीय ट्रस्टी असून या



टिटू

ट्रस्टमधून भारताचे भूशास्त्र, जीववैविध्य आणि पुरातत्वीय अभ्यास या क्षेत्रात काम केले जाते. निवृत्तीनंतर त्या या ट्रस्टचे पूर्णवेळ काम पाहातात. कोविड काळात ७५ ऑनलाईन अभ्यासक्रमांचे आरेखन आणि आयोजन त्यांनी केले.

त्यांची आजवरची प्रसिद्ध पुस्तके:

सहस्रकातील विज्ञान, वृक्षराजी मुंबईची, सेंट्रीज ऑफ मुंबई या तीन पुस्तकांचे संकल्पन आणि संपादन, प्रकाशन.

आयन रॅन्ड लिखित अॅटलस श्रग्ड, द फाउंटनहेड या दोन महाकादंबऱ्याचा अनुवाद.

मालाकाईट कॅस्केट या उरालच्या लोककथांचा अनुवाद

जे आर आर टॉल्कीनच्या लॉर्ड ऑफ द रिंग्ज या जगद्विख्यात अद्भुत महाकादंबरीचा अनुवाद

क्लायमेट चेंज रिकन्सिडर्ड या पुस्तिकेचा अनुवाद

आय ऍम अ ट्रोल, शॅडो आर्मीज, द गॉड डिल्यूजन, ऑन टिरनी, द रीयुनियन या राजकीय पुस्तकांचे अनुवाद.

७० हून अधिक इंग्रजी कवितांचे अनुवाद.

याच बरोबर त्यांनी विपुल स्फुटलेखन केले आहे.




टिटू

मुग्धा कर्णिक यांचे ई साहित्यवरील इतर साहित्य.

कव्हरवर क्लिक करताच पुस्तके उघडतील.





# टिटू







# टिटू...

घर सुनंसुनं झालं होतं हे तर टिटूच्या येण्याचं खरं कारण होतं. मुलीचं लग्न झालं होतं, मग तीन वर्षांनंतर ती गेली परदेशी. तिच्या पाठोपाठ मुलगाही गेला शिक्षणासाठी. नकोसं वाटायचं घर. त्यांची पुस्तकं, त्यांचं सामान, त्यांच्या वावराविना खायला उठत होतं. जरी मी कामात रहात होते तरीही. कितीही व्यग्र राहिलं, कितीही लिहीत राहिलं तरी एक पोकळी मधेच चाल करून यायची.

मीराताईंकडे अधूनमधून जात असते मी. त्यांचं अंगण-घर पक्ष्यांनी भरलेलं. घरात दोन छानसे भुभू... छान वाटायचं. घरात मासे असले तरी ते तुमच्याशी काही संवाद साधत नसतात. डोळ्यात पाहाणारं, स्पर्शाने संवाद साधणारं कुणीतरी हवं असतं. आणि २०१४च्या ऑक्टोबर महिन्याच्या एका सुंदर दिवशी मीराताईंकडे गेलेले असताना- खरं म्हणजे भेटून निघत असताना सुबोध भेटला. ख्रिस्तोफरने त्याच्याकडची एक बजरिगर बेटी त्याच्याकडे दिली होती. छोट्याशा हिरव्या पिंजऱ्याच्या


टिटू

टोकावर बसलेली. तिला बोटावर हातावर घेत सुबोध म्हणाला, मुग्धाताई घ्या ना हातात. अगदी गोड पाखरू आहे. बोट पुढे करताच आलंच ते बाळ बोटावर. लगेच अंगावर चढलं. कुडत्याच्या गळयाभोवतीच्या रेशमी नक्षीशी खेळू लागलं. गळयातल्या सोनसाखळीशी चाळा करू लागलं. मी जायला निघाले आणि तिला सुबोधकडे सोपवण्यासाठी बोटावर घेतलं. सुबोधने हात पुढे करताच ती त्याच्याकडे न जाता उलटी माझ्याच हातावर चढत पुन्हा खांद्यावर आली. पुन्हा त्याने प्रयत्न केला. छे ते चिकटलंच होतं मला. अरे बाळा, जा, मी निघतेय. छे कसलं काय. सुबोध म्हणाला, मुग्धाताई, तुम्ही जा याला घेऊन आता. संजीवनच्या आहात. घरात मासे आहेत, पण पक्षी नाही कधीच ठेवले तुम्ही. न्या त्याला.

म्हटलं, अरे पक्षी एकदा नेलेला मी, कॉकॅटील होता. तिसऱ्या दिवशी मरून गेला तो... नकोच मला रडारडीची वेळ आता. तो म्हणाला, अहो, बजीज् तसे कणखर असतात. जगतातही भरपूर. पंधरा वर्षं तर जगतातच. आणि काही त्रास नसतो. तुम्हाला माहिती आहेच. काही लागलं तर आम्ही आहोतच की सांगायला. ही ख्रिसची बेटी आहे. तोही सांगेल. म्हणत त्याने ख्रिसला फोन लावला. ख्रिसने तर न्याच त्या बच्चूला म्हणून हट्टच धरला.

तोवर त्या अंगभर उड्या मारणाऱ्या बाळाने मनातच घरटं केलेलं. मीराताईंनीही खूप प्रेमाने विश्वास दिला. मुग्धाताई, जा घेऊन, खरंच खूप





बरं वाटतं पक्ष्यांच्या संगतीत. हे बच्चू तर माणसाळलेलंच आहे. नाही जमत वाटलं तर इथं परत घेऊन या.

मी त्या बाळाच्या गोडव्यापुढे शरणागती पत्करली. आले तिला घेऊन... घरी.

त्याच्या त्या एवढ्याशा पिंजऱ्यात मनात येईल तेव्हा जाऊन बसायचं, मनात येईल तेव्हा आमच्या बेडरूमभर फिरायचं, बेडवर फिरायचं, आरशासमोरच्या टोपलीवर ठेवलं की खूष. बेडरूममध्येच ठेवला त्याचा मुक्काम. अजून फारसं उडउड चालली नव्हती. छोट्याछोट्या उड्यांनी उडणं...

त्याचं नाव ठेवलं टिटू. ख्रिस्तोफरने सांगितलं हे बाळ बहुतेक मादी पक्षीण आहे. एक महिन्यात नक्की कळेल. नाकपुड्यांच्या भोवतीची लव निळसर झाली तर नर, पांढरीच राहिली तर मादी. टिटू नाव बरं होतं. दोन्हींकडे चालणारं. एक महिन्यात कळलंच की ही पक्षीणच.

या एकाच महिन्यात टिटूने आमचा ताबा घेतला. घरात टिटूटिटूचा जप सुरू झाला. ऑफिसला जाताना तिला सोडून जायला जिवावर यायचं. घरी पोहोचताच केवळ लिफ्टपर्यंत आम्ही आलो की तिची टिटिव सुरू होत असे. बाळच झालं ते आमचं. मुलं लहान असताना कुठेही जायला निघाले की म्हणायची- तू जाऊ नको नं... तू कधी येशील... टिटू





जवळपास तशीच म्हणायची असं वाटतं. बोटावरून खाली सोडलं की परतपरत यायची. काहीतरी खाऊ घालायचं आणि पटकन् निसटायचं.

घरात काम करतानाही हिला कुठंतरी बसवलं तर झटकन् पाठीवर येऊन बसायची. दचकायला व्हायचं सुरुवातीला. मग कानातल्याशी खेळ, गळयातल्याशी खेळ, कपडा चोचीत धरून ओढ असं काहीतरी करत रहायची.

आणि मग दुसऱ्या महिन्यानंतर अचानक तिला आईपेक्षा बाबा आवडू लागला. तो बेडवर पडून वाचत असला की त्याच्या पायाची खोबण उशीवर टेकली असेल तिथे जाऊन ही जणू घरघर खेळायची. अंगठ्याजवळची जाड कातडी चोचलत रहायची. माझ्याकडे बोलावलं, बोटावर घेतलं तरी पटकन् पुन्हा त्याच्याकडेच जायची. भूक लागली की मगच आई...

बाबाबरोबरचा सर्वात लाडका खेळ म्हणजे पायापासून सुरुवात करून वरपर्यंत चालतचालत यायचं आणि मग हातातला पेपर चोचीने कातरायला सुरुवात करायची. तो त्याने बाजूला ठेवला की मग पोटावरून खांद्यावर, खांद्यावरून शेजारच्या दिव्याच्या दांडीवर... पेपर वाचून झाल्यावरही नीट ठेवणारांच्या घरात या पाखराने एकदमच बदल घडवला.





गच्चीतून एखादं फूल आणून टेबलवरच्या फुलदाणीत ठेवलं की बाई मान उंचावून देठ कुरतडून ठेवणार म्हणजे ठेवणारच. पुस्तकं वगैरे चुकूनही बेडवर ठेवून चालण्यासारखं नव्हतं.

आणि मग तीन दिवसांसाठी धनंजय गावी गेला. शनिवार-रविवारला जोडून गेलेला. मी एक दिवस ऑफिसला होते. आणि बाकी दोन दिवस घरीच. त्या दोन दिवसांत टिटूने माझ्यावर असा काही राग काढला की मी पाहातच राहिले. खांद्यावर बसून एका गालाला अठरावेळा चोचीने टोचलं, चावलं. मी म्हटलं चाव किती चावतेस ती, बघू तरी. पण थांबायचं नाव नाही. मग धरलं अखेर पोकळ मुठीत आणि भरपूर रागे भरले. आपल्याच पोराला रागवावं तसं. मिटीमिटी बघत राहिली. लालेलाल झालेला गाल दाखवला तिला, पुन्हा ओरडले. एका बोटाचा हलकासा धपाटाही घातला. मग पुन्हा जवळ घेऊन समजावलं... बाळा, असं चावू नये... किती दुखलं बघ आईला.

आठवलं, एकदा शिबिरासाठी आठ दिवस घरापासून लांब राहिलेले. सुश्रुत तेव्हा तीन वर्षांचा होता. मी परत आले तेव्हा धावत भेटायला म्हणून पुढे आलेला- आणि मग अर्ध्यातच रागात थांबला. मी पुढे होऊन उचलून घेतल्याबरोबर एकच थोबाडीत वाजवलेली माझ्या- नि मग रडू लागलेला.






हे टिटूबाळ, संतापलं होतं, बाबावर... मग राग निघाला माझ्यावर... माझ्या गालावरच. मग काय ते माझं खरंखरं बाळ झालं... पण बाबा आल्यावर अख्खा दिवस त्याच्याकडेच. माझ्याकडे फिरकायलाही तयार नव्हती.

आम्हा दोघांनाही वाटायला लागलं होतं- की टिटू स्वतःलाही आमच्यासारखंच समजू लागली असावी. माणूस. तिने तिच्यासारख्या पक्ष्यांना पाहिलंच नव्हतं... ती चालत चालत फिरायची. आमच्या प्लेटमधून खायची.

पण मग वाटलं की हिला सोबती हवा आता. नर सोबती. ख्रिस्तोफरला सांगितलं बाबा, टिटूबेटूला नवरा हवा... ख्रिस्तोफरने सांगितलं तिच्यासाठी अशाच माणसाळलेल्या नराची गरज आहे. माणसाळलेला नसेल तर दोघांनाही प्रश्न पडेल की हे पाखरू असलं कसलं... थोडा वेळ लागेल. पण आठवड्याभरातच जानेवारी महिन्यात ख्रिस्तोफरने एक नाजूक आकाशी रंगाचा नर बजी आणून दिला... त्याचा रंग इतका हलकाफूल होता की वाटलं टिटूला मत्सरच वाटेल त्याला पाहून.

याचं नाव मी अगदी सहजच ठेवलं शोन... जर्मन भाषेतलं शोन... सुंदर.







शोनला घरी आणलं. त्याला पाहून टिटू चक्रावली. शोनही चक्रावला असावी. दोघे गप्प बसून राहिले. पण मग आम्ही तिला बोटावर उचलून घेतलं. शोनलाही दुसऱ्या बोटावर घेतलं. अरे बाप रे... मत्सराग्नी भडकलाच. टिटू कसली खवळली... किचकिचकिचकिचिकीच... बिचाऱ्याच्या अंगावर धावूनच गेली. शोन तसा सत्पुरुषच. त्याने अजिबात प्रतिहल्ला चढवला नाही. लांब सरला. मागे गेला. धनंजयच्या मानेवरच्या कॉलरवर मध्यभागी बसून राहिला. यानंतर ही जागा म्हणजे त्याची वतनदारीच झाली.

टिटू माझ्या खांद्यावर किंवा बोटावर किंवा चष्म्याच्या काडीवर बसून त्याच्यावर कातावायची. तू कोण? वेडा. घर माझंय. वेडा. हे आईबाबा माझे आहेत. वेडा. तू जा इथून. वेडा. तू पक्षी आहेस. वेडा. मी माणूसपक्षी आहे. तू वेडा आहेस. किचकिच किचकिच... मग तो तिथे कॉलरवर बसलेला असताना ही उठून बाबाच्या खांद्यावर जाणार. आणि मग जोरात अंगावर जात त्याला कॉलरवरून उतरायला लावणार. शोन बिचारा स्त्रीदाक्षिण्य दाखवत उडून खाली आला तर ठीक. चुकून तो माझ्याकडे आलाच तर मग पुन्हा त्याला तिथून हाकलणार. कसली आक्रमक होती ती!

तो जी कोथिंबिरीची काडी चोचीत घेईल- तीच म्हणजे तीच टिटूला हवी असायची. मग तो ती काडी तिला बहाल करून टाकून दुसरी काडी





तोंडाला लावे. की ही बया त्या काडीवर. नंतर सुकट-बोंबीलची चव लागल्यावर सुक्या बोंबलाच्या चार तुकड्यांतला लांबडा तुकडा ही पहिला काबीज करणार. दोन्ही पायांनी तो तुकडा धरून ठेवून खायला सुरुवात करणार. मग मधेच वर पाहाताना लक्षात आलं की शोनही खातोय- की त्याच्याकडच्या बोंबलावर हक्क सांगायला ही आपल्या पंजातला तुकडा सोडून देणार. शोन बिचारा गप्पपणे बाजूला होत असे. टिटू, असं नाही करायचं, म्हणत आम्ही त्याची बाजू घेतली, तिला उचलून घेतलं की आपलाच विजय झाल्याच्या आविर्भावात चोच वासून त्याला लांबून धमकावणार. लाडावलेली लेक नुसती. द्वाड टिटू.

दोघेही घरभर मोकळेच असत. त्यांच्या पिंजऱ्यांच्या खोलीतून म्हणजे आमच्या बेडरूममधून स्वतःहून कधीच बाहेर येत नसत. नाश्त्याच्या, जेवणाच्या वेळी हॉलमधल्या डायनिंग टेबलवर यायचं, वॉशबेसिनमध्ये आंघोळ करायची की टिटू खांद्यावरचं कापड ओढून सांगायची, चला परत. तिला सोडलं की शोनची घाई... मलापण मलापण मलापण.

आंघोळीचं एक कौतुकच... पहिल्यांदा टिटूने आंघोळ केली ती एका वाडग्यात बटणमोगऱ्याची देठासकट फुलं ठेवली होती तेव्हा. प्रथम खालूनच देठ कुरतडून पाहिला. मग वाडग्याच्या कडेवर चढून तो कुरतडला. मग पाणी प्यायला लागली. मग काय झालं कळलं नाही. पाणी





पितापिता बुदकन् आतच पडली की पाण्याची हाक आली माहीत नाही. मनसोक्त डुंबत राहिली. मग एक दिवस वॉशबेसिनजवळ मी हात धूत असताना हे पात्र खांद्यावरच होतं. माझा हात धुवेपर्यंत हातावरून खाली उतरत सरळ बेसिनच्या वाडग्यातच उतरली. हॉ... टिटू... म्हणेपर्यंत तिने नळात धबधबा शोधला. आणि थेट धारेखाली मान धरून आंघोळ सुरू केली. शोनचं आगमन होण्याआधीपासूनच हे कौतुक सुरू झालेलं.

ऑस्ट्रेलियात थव्याने उडणारे हे पक्षी जलाशयांच्या जवळपासच्या झाडांवर रहातात. ढोल्यांतून अंडी घालतात. पाण्याची हाक येणं स्वाभाविक म्हणायचं. पण मग आमचा शोन मात्र अगदी घाणेरडाच म्हणायचा. पाणी म्हटलं की पळायचा. इतक्या वर्षांत दहाबारा वेळा आंघोळ केली असेल. शोनची आंघोळ काचेच्या वाडग्यात, पेल्यातच मर्यादित असे. वाहत्या नळाखाली दोनतीनवेळाच केली असेल तीसुद्धा अगदीच कावळ्याची आंघोळ. टिटू आंघोळ करू लागली की त्यालाही घेऊन आम्ही उभे रहायचो, स्वतःहून जाईल अशी पाट पाहात. पण छे. अरे शोन आंघोळ कर... बघ टिटू कशी मस्त मजा करतेय. पण शोन कोरडाच. मग एकदा जबरदस्तीने गप्कन् पकडून धरलं नळाखाली. तर चावलाच हाताला. पळापळ... त्यानंतर त्याला आंघोळ हा शब्द कळायला लागला. आंघोळ म्हटलं की तो आमच्यापासून दूर धूम ठोकून पिंजऱ्यात जाऊन बसे. क्वचित कधीतरी स्वतःहून उतरला आणि शंभो



केली असं व्हायचं तेही त्यांना पिलं झाली आणि एक पिल्लू आईवर पडून आवडीने आंघोळ करू लागलं तेव्हा...

टिटू माझ्या तोंडातून हक्काने मागून खात असे, पण पापी दे म्हटल्यावर पापी कध्धीच दिली नाही तिने. शोनला म्हणायचा अवकाश... पापी दे की सुरूच. ओठांवर चोचीने नाजूक पापी. विसरू शकत नाही.

या जोडीचं प्रेम काही जमेना. आईबाबांनी लेकीचं लग्न मनाविरुद्धच लावून दिलेलं जणू... शोनच्या एकतर्फी प्रेमाला पातळ प्रतिसाद क्वचित मिळे. तेही या गधडीला मान-पाठ-डोकं खाजवून हवी असे तेव्हाच. पण आता निदान शेजारी शांतपणे बसू तरी लागली त्याच्या. गच्चीत त्यांच्यासाठी एका कुंडीत कांग पेरले होते. त्याला छान कणसं लागली. दाणे भरायच्या आधीच वर गच्चीत येणारे आयोरा, बुलबुल, शिंपी, चिमण्या कणसं फस्त करू लागली. चारपाच कणसं अर्धीमुर्धी राहिली तेव्हा ती कुंडी खाली आणून त्यांच्याजवळ ठेवली. फार गुण्यागोविंदाने तो चारा दोघांनी खाल्ला. सहजीवनाची सुरुवात केली.

माझी टिटू २०१५च्या एप्रिल महिन्याच्या चारपाच तारखेपासून पहिल्यांदाच खांद्यावर बसून माझ्या तोंडातून चावलेला घास मागून खाऊ लागली. अगदी भांडूनभांडून घास मागत होती. आणि चावला जाईपर्यंतही तिला थांबण्याची उसंत नसे. हे काय नवीनच असं झालं मला. पण भारी गोडही वाटत होतं. मी तोंड तिच्याकडे वळवलं नाही तर जोरजोरात बाही




ओढून, कानाला हलकेच चावा घेऊन, किंवा केस चोचीने ओढून घास मागत रहायची. नाश्ता आणि दुपारी घरी असेन तेव्हा दुपारचं जेवण असंच टिटूसोबत घास वाटून घेत चाललं होतं. पक्षीतज्ञ मित्रांना विचारून घेतलं असं चालेल का की तिला त्रास होईल. तर तो म्हणाला- तिलाही त्रास नाही नि तुलाही होणार नाही. असं करतातच ही पाळलेली पाखरं. बिनधास्त खाऊ दे. शोन म्हणजे आमचा बाप्या बजरिगर बघत बसायचा किंवा तिच्या मागोमाग खायलाही यायचा. पण त्याला काही हा प्रकार आवडत नव्हता. तीही तो खाण्यासाठी म्हणून खांद्यावर आला तर हाकून देत होती.मी खाऊ लागले की माझ्या तोंडातून घाईघाईने खायचा प्रयत्न करायची. कांगचे दाणे वगैरे खाल्ले तरी तिला आमच्या प्लेटमधलं सगळं हवं असायचं. मेदूवडा, इडली, शिरा, उपमा, पोहे, ऑम्लेट, थालिपीठ सग्गळं हवं असायचं. त्याचा घास मी घेतला रे घेतला की ती खांद्यावरून पुढे डोकं काढून ओठातच तोंड घालायची. मग अखेर चावलेला घास तळहातावर घेऊन तिला द्यायला सुरुवात केली. घास चावून हातावर घेईपर्यंत तिला दम नसायचा. तिची ती घाई अजून आठवते... माझ्या तळहातावरून ती खात असल्याची जाणीव अचानक फसवून जाते... आणि गाल गरम होतात तिच्या चोचीच्या आभासाने...



टिटू







मग नाश्त्याच्या वेळची मारामारी जरा कमी झाली. ती माझ्या तोंडातून खात असे ते पाहून शोनूला गंमत वाटत होती की काय कोण जाणे. तोही जवळ यायचा. पण खायचा नाही. एकदाच त्याने हातावरच्या घासाजवळ चोच आणली तर ही बया अशी चित्कारली... शिवीगाळ... ए शहाण्या, जास्त लाडात नको यायला. तुला मी सहन करते म्हणजे काय आईचा घास तू खायचा नसतो. पळ्. शोन बिचारा गेला वतनदारीवर, बाबाच्या कॉलरवर.

मग एकदा आम्ही दोघे नाश्त्याला सुकटभाकरी खात असताना टिटूला भाजलेल्या सुकटीचा शोध लागला. आणि मग आम्हाला त्यांच्यासाठी नवा प्रथिनांचा स्रोत गवसला. ताजीताजी सुकट भाजून आली की टिटू ज्या तडफेने ती ताब्यात घेत असे ते मोठं मजेशीर असे. ताटलीच्या मधोमध बसून सुकट खायची ती. जेणेकरून शोनने कुठून तोंड घालू नये. माझं झालं की खा ना तू... चोंबड्या. भाजलेले बोंबील खाताना तेच. पक्ष्यांमधल्या माद्या किती आक्रमक असतात. वंश चालवण्याच्या जबाबदारीचे पुरेपूर मोल वसूल करतात असं राहूनराहून वाटायचं.

यानंतर पुढले काही महिने दोन्ही पाखरं जरा गोडीत होती. म्हणजे टिटू त्याच्याशी गोडीत होती. आम्ही दोघे मे महिन्यात अमेरिकेला गेलो.





तेव्हा दोघांना शेजाऱ्यांकडे ठेवलं. तिथेही शहाण्यासारखी राहिली. कौतुकं करून घेतली. शेजारी आम्हाला कळवत होते. पण प्रथमच त्यांना सोडून राहिलो होतो. धाकधुक होती. खरी धाकधुक होती, विसरणार तर नाहीत ना... पण महिन्याभरानंतर परत आलो तर लिफ्टमधे असतानाच तिथून हाका आल्या. शेजारच्यांनी सांगितलं, की तुम्ही खालीच असाल- टिटूने ओरडायला सुरुवात केली. लगेच घरात आणलं. तर लाडाचा नुसता ऊत आला. किती उड्या, किती उड्या... दुपारभर कोडकौतुक करून घेतलं. अमेरिकेहून त्यांच्यासाठी काहीतरी आणायचं म्हणून एक शिडी, एक लाकडी खोका, एक स्कटलबोन. कसलंतरी मिक्सफूड आणलं होतं. कशाकडेही ढुंकूनही पाहिलं नाही दोघांनी. तो बॉक्स लावला दुसऱ्या दिवशी पिंजऱ्याच्या आतल्या बाजूने... वरच्या दांडीवर बसून त्यावर वारेमाप शिटून तेवढं ठेवलं. अजून त्याची गरज निर्माण झाली नव्हती.

डिसेंबर महिन्यात माझी लेक घरी आली. आल्यावर टिटू-शोनची लाडकौतुकं पाहून पूर्ण जेलस... शोनू टिटूपेक्षा माणसांच्या भाषेला अधिक प्रतिसाद देतो हे एव्हाना कळलंच होतं. टिटूला आईबाबांचे लाड पुरेसे होते. ती काही तिला जास्त चिकटत नव्हती. पण शोनूने तिच्या शोनूssबर्डीsss या गोड हाकेला मन भरून प्रतिसाद दिला. माझी पापी घ्यायचा तशी तिचीही पापी घ्यायला लागला. आमच्या घरात एक नियम बनला होता. त्यांना बाहेर हॉलमधे आणलं की स्वयंपाकघराची सताड





खिडकी बंद करून घ्यायची. हॉलच्या खिडकीचं एकच कवाड उघडं असे, पण तेही बंद करून घ्यायचं. जग म्हणजे काय हे न समजताच माणसांच्या दुनियेत वाढलेल्या या पाखरांना धोका काय ते कळतच नाही. त्या दिवशी अमृताने तिच्या लाडक्या शोनूला अनवधानाने त्यांच्या खोलीतून बाहेर हॉलमधे आणलं, खिडक्या उघड्याच होत्या आणि संध्याकाळ होत आलेली. तेवढ्यात रंजनाबाईंनी काहीतरी पाडलं... आणि त्या आवाजाने दचकून शोनू उडाला तो थेट स्वयंपाकघरात... अमृता किंचाळली... शोनू गेला, शोनू गेला. हृदयच जणू उडून गेलं. अमृताने तो गेला ती दिशा पाहून ठेवली होती. ती धावत जिन्यानेच सहा मजले उतरून खाली गेली. मी वरून खिळून पाहात राहिले. अमृता खाली जाऊन खालच्या रस्त्यावरच्या सर्वांना, रिक्षावाले, वॉचमन सर्वांना विचारू लागली- एक निळा पक्षी पाहिलात का इथे आलेला... किसीने देखा क्या... नीले रंग का पंछी... कोण पाहाणार. तो ज्या झाडाच्या दिशेने झेपावल्यासारखं वाटलेलं तिला तिथे ती उभी राहिली. इतक्यात बाबा आला. त्याची गाडी हिला पाहून थांबली. तो उतरला. आणि त्याने झाडाजवळ जाऊन हाक दिली... शोनू, शोनू...

आणि एकदोन क्षणानंतर हाकेला प्रत्युत्तर आलं. इथेच आहे मी. मग दिसला एकदाचा... घाबरून बसलेला पानजाळीत... राजेशने झाडावर चढून हात पुढे केला. आलं वेडं... त्याला हातात घेतलं आणि खाली

उतरला. वर आणलं तेव्हा ते एवढंसं पाखरू- थाडथाड उडत असावं त्याचं हृदय- थरकापत बसून राहिलं. टिटूच्या गावात पत्ताच नव्हता... बाप रे... गेलेला पक्षी परत आला- विश्वासच बसत नव्हता. अमृता म्हणाली- तो गेला तेव्हा सर्वात भीती वाटलेली तुझं काय होईल याच विचाराने...

पण असा धक्का शोन अजून दोनदा देणार होता. आणि टिटू एकदाच.

यानंतर टिटू आणि शोनसाठी खेळायला एका लहान झाडाची कुंडी त्यांच्या खोलीत आणून ठेवली. टिटू मस्त फांदीफांदीवर खेळू लागली. पण शोन झाडावर जाईच ना. बोटावर घेऊन फांदीवर ठेवू गेलं तरी बसायला मागे ना. झाडाची भीतीच घेतली बेट्याने.

यानंतर शोनू मला वाटतं अगदी गंभीर झाला. जबाबदार झाला. टिटूला भरवणं, काहीतरी काडीकोथिंबीर नजर करणं वगैरे करताना दिसू लागला. तिची शिंग जरा कमी बाहेर निघू लागली. शोनू जरा जास्त वेळा पाण्यात डुबकीही मारू लागला. उन्हाळ्याचा परिणाम की सखीला खुष करण्याचा उपाय- कोण जाणे.







आणि मग २०१६चा एप्रिल उजाडला.

एप्रिलच्या शेवटच्या तीनचार दिवसांत टिटूने माझ्या बोटावर येताच, बोट चाव, ओठ चाव, नाकावर जोरात टोच मार असं अचानकच सुरू केलं. काही कळेना अशी काय झाली ही... पहिल्या दोन महिन्यात केलेल्या चावाचावीनंतर कधीही चुकूनही न चावणारी टिटू अशी कशी मला चावायला लागली. मूड स्विंग होता तिचा. तिच्या शिटाचा आकार वाढलेला. सारखी खात होती आणि नेहमीची लाडकी आंघोळ करायच्चीच नव्हती. चालणं हळुहळू. उडणं कमी. धनंजयला म्हटलं ही अंड्यावर असेल का रे... पण कळायला काहीच मार्ग नव्हता. तिच्या साठी लावलेल्या बॉक्समधे ती गेले दोनतीन महिनेपासून जाऊन बसत होती तशी. पण कशासाठी- शोनूला टाळण्यासाठी की कामाची वस्तू म्हणून ते आम्हाला कसं कळणार...

आणि मग १ मे- रविवारी संध्याकाळी लक्षात आलं ती बोटावर येऊन खांद्यावर शहाण्यासारखी बसली. तिच्या लाडक्या झाडावर जाऊन बसली. पण शोन काही हटेना बॉक्सजवळून. त्याला म्हटलं, ए, तुझी सुंद्री तिथे आणि तू काय करतोस इथे... जवळ गेले तर दिसलं. आत एक करवंदाएवढ्या टपोऱ्या मोत्याएवढं अंडं होतं. आणि शोन राखणीला बसून होता. आम्ही दोघेही लगेच आजीआजोबांच्याच भूमिकेत.





दोन दिवसांनंतर तिने आणखी एक अंडं घातलं. पण शोन सारखा आत शिरून ते अंड इकडून तिकडे हलवताना दिसत होता. संध्याकाळी पाहिलं तर दोन्ही अंडी फुटून गेलेली. मग टिटूला थोडं दुसरीकडे नेऊन बॉक्सच्या सर्व कोपऱ्यांत लाकडाचा भुसा मागवून घेऊन अंथरला. त्यातला अर्धाअधिक बाईंनी बाहेर लोटून टाकला. पण मग पाच मेला आणखी एक अंडं घातलं आणि मग आठ मेला आणखी एक. दोन्ही अंडी शाबूत. पहिलटकर, अननुभवी आई नि बाबा. काय करतील प्रश्नच होता.

आम्ही दोघे जवळ गेलो तर चालत होतं त्यांना पण नेहमीच्या पाहाण्यातल्या काम करायला येणाऱ्या दोघी बायका आत आल्या रे आल्या की शोन कचकचाट करत होता आणि तीही करवादत होती...

बजरिगर्स चार ते आठ अंडी देतात. पहिलीच वेळ म्हणून कदाचित् चारवर थांबेल. आहेत ती दोन जगतील का... प्रश्नच प्रश्न. मग अखेर आमच्या टिटूबाईंनी एकूण आठ अंडी घातली. त्यातली पहिली दोन तिच्या धांदरट दादल्याने फोडून ठेवली त्यामुळे सहा शिल्लक होती. वेंधळ्या मूर्ख दादल्याने पहिली दोन अंडी फोडून ठेवल्यावर टिटू आता त्याला बॉक्समधे अजिबात येऊ देत नव्हती. बॉक्सच्या दाराच्या फार जवळ येऊन बसला तरीही झेप घालून त्याला पिटाळून लावत होती. पाचवं अंड तिने चुकून खाली घातलं होतं. तेव्हा तर दिवसभर त्याला





बाहेरच ठेवलं होतं. मी आल्यानंतर ते अंड उचलून बॉक्समधे ठेवलं तेव्हा कुठे त्याला आत प्रवेश मिळाला.

या बाळंतपणाच्या घोळात आणखी एक गंमत.

साधारण २६ एप्रिलपासून टिटूबाईंनी आंघोळ केली नव्हती. आंघोळ फार प्रिय तिला. मनसोक्त डुंबत असायची नळाखाली किंवा वाडग्यात किंवा आमच्या पाणी पिण्याच्या उंच ग्लासमध्ये सरळ उडी घेऊनही. पण एप्रिलच्या अखेरीपासून पूर्ण थांबलेली आंघोळ.

मधेच बाहेर आणलेलं तिला, कंटाळली असेल म्हणून. स्वतःच आलेली बोटावर आपखुषीने. तेव्हा टेबलवर खाऊ खायला फिरताना तिच्या आंघोळीचा लाडका ग्लास उपडा ठेवलेला पाहून त्याच्याजवळ गेली. आणि चोचीने त्यावर टकटक केलं. मी ग्लास भरून द्यायला बेसिनजवळ गेले तर उडून थेट बेसिनमधेच आली. आणि पाण्यात लोळूनलोळून आंघोळ केली. मग क्रीळकक्रीळक करून उचलून घ्यायला सांगितलं. नेहमीसारखं नॅपकिनने अंग पुसून घेतलं.

तिला तिच्या घराजवळ सोडलं तेव्हा अंड्यावर गेली नाही.





टिटू

मी म्हटलं ही आता ओलसर पिसांनी कशी बाई जाणार अंड्यावर... वल्ली बाळातीण!!! मी हेअर ड्रायर दुरूनच सुरू केला आणि तिच्या दिशेने गरम हवेचा झोत सोडला. लगेच बंद करून ठेवला. तिला म्हटलं, करू तुझं अंग कोरडं ड्रायरने? ये, हवं तर. ते शहाणं पाखरू लगेच आलं बोटावर, बोटावरून खांद्यावर. लो स्पीडवर ड्रायर सुरु केला. लांबच धरून खांद्याच्या दिशेने सोडला. तिने माना वेळावून वेळावून अंग कोरडं करून घेतलं. पाठ फिरवून शेपटीपण छानपैकी सुकवून घेतली. हेअर ड्रायर बंद केला, तर पुन्हा क्रीळकक्रीळक. पुन्हा थोडावेळ ती उबदार हवा पंखांवर घेतली.

मी नीट तपासून पाहिलं. छान कोरडी झालेली. मग लगेच अंड्यांवर झेपावली.

या पाखराला वाटत होतं की ते माझ्यासारखं माणूसच आहे किंवा मी तिची पाळीव पक्षीण आहे...

कोण जाणे काय वाटत असेल.

दरम्यान शोन नुसताच बसूनबसून कंटाळून गेलेला. त्याची सखी सारखी बॉक्समधे जाऊन बसते. बोलायला जावं तर हाकलते. काल मी घरी होते तर सारखा येऊनयेऊन तक्रार सांगत राहिला. खांद्यावर बसून





चोच लावून लाडेलाडे करीत राहिला. पण पाच मिनिटाच्यावर काही घराबाहेर रहात नव्हता...

तुझं नि माझं जमेना आणि तुझ्यावाचून करमेना अशी गत... म्हटलं बाबा रे अजून दीड महिना- पिल्लं पूर्ण वाढेपर्यंत तुला भाव नाही. शांत रहा.

१८ मे २०१६ अंडी घालण्याचा कोटा पुरा झाला, आणि जबाबदारी आलेली टिटू आता सतत सहा अंड्यांवर बसू लागली. शोनूही बराच काळ तिथेच बसून राहू लागला. क्वचित कंटाळा आला की जरासा भरारी घेऊन इकडे तिकडे बसायचा आणि परत एक मिनिटाच्या आत घरात परतायचा. ती मधूनमधून त्याला हाकलून काढण्याचं काम करीत रहायची.

आणि काल टिटूला एकदम त्याची दया आली की प्रेम आलं... बाहेर आली खूपखूप लाड केले, करून घेतले... एकदम आज सजन मोहे अंग लगा ले...

कालपासून ती आत गेली की तो अर्ध अंग बाहेर ठेवून तिच्या मानेला, पाठीला चोचीने घासून देतो. चारदोन क्षण पूर्ण आतही शिरतोय. टिटू दिवसातून फक्त एकदादोनदाच बाहेर येतेय. आणि शोनू बहुतेक तिला





भरवतोय. ती स्वतःचं स्वतः खायला पाणी प्यायला आणि शिटायला बाहेर आली की तो आपला बॉक्सजवळ शांत बसून रहातोय.

आपल्याला इतर जीवांवर मानवी भावनांचं प्रत्यारोपण करायची खोडच असते.

हे म्हणजे अगदी- होगा कोई बीच तो हमतुम और बंधेंगे झालेलं...

अजून पहिलं लेकरू बाहेर यायला सहा दिवस होते...

पण तसं व्हायचं नव्हतं.

टिटूने आठ अंडी घातली. त्यातली सहा नीट न फुटता राहिली.

पण पहिलटकरणीच्या अंड्यांत जीवच नव्हता बिचारीच्या. सारी अंडी अनफर्टिलाईझ्ड होती. टिटू बिचारी निष्ठेने ती उबवत होती. जवळ गेलं तर रक्षणासाठी सरसावत होती. शोनला हाकलत होती. पण वेळ सरून गेली तरी अंड्यांमधून काहीच हालचाल झाली नाही. अखेर मोबाईलच्या दिव्यावर ठेवून तपासायचं ठरवलं. टिटूला बॉक्समधून बाहेर काढलं, संतापली होती. चावली पण. तरीही केलं बाजूला आणि एकेक अंडं काढून दिव्यावर ठेवून पाहिलं.. तर कळलं सारीच निर्जीव.





पण अंडी काढून घ्यायला अजून माझाच जीव होत नव्हता. एका अंड्याला किंचित लालसर रंग आहे असं वाटत राहिलं. माझं विशफुल थिंकिंग होतं ते.

सकाळी टिटू बाहेर आली. पाहाते तर काय. तिच्या पोटाला एक अंड टिचकून चिकटून राहिलेलं. पिसं चिकटलेली. तिला हलकेच हातात घेतलं. थोडंथोडं पाणी लावून चिकटलेलं अंड सोडवलं. तेव्हा लक्षात आलं तिने पोटाजवळची सारी पिसं काढून टाकली होती. अंड्यांना पुरेशी ऊब मिळावी म्हणून पक्षिणी पोटाजवळची पिसं कमी करतात. तिथल्या पातळ त्वचेतून शरीराच्या आतली ऊब थेट अंड्यांना मिळावी म्हणून. सतत बसून असे बिचारी टिटू. अंड्यांवरून उठून अर्ध एक मिनिट बाजूला होत होती. शिटण्यासाठी, दाणापाण्यासाठी, पाय नि पंख थोडे लांबवण्यासाठी...

बिचारं माझं शोनुलं इतका प्रयत्न करतंय- पण तिच्या ओटीत काहीच पडणार नाहीये हे मला माहीत होतं... आठ तारखेपर्यंत वाट पाहायची असं ठरवलेलं. अजून त्या एका अंड्याच्या जिवाची आशा मलाही होती- तिच्यासाठी.

त्यानंतर मात्र अंडी काढून टाकावी लागतील. बॉक्सही काढावा लागेल. तिला विश्रांती द्यावी लागेल. मग सहा महिन्यांनंतर पुन्हा बॉक्स लावायचा.







पहिल्या अनुभवानंतर पाखरं शहाणी होतात म्हणे. आणि मग सारा अनुभव नीट वापरून पुढला संभवोत्सव नीट पार पडतो.

दुःखात सुख हे एवढंच... अखेर टिटूची वाया गेलेली चार अंडी काढून टाकली. ती अगदीच अस्वस्थ होऊन जाऊ नये म्हणून मिणमिण आशेचं एक अंडं तिथेच राहू दिलं. टिटू त्यावर बसली सकाळपासून दुपारपर्यंत. नंतर तिचं आताबाहेर करणं वाढत गेलं, मग बराचबराच वेळ बाहेरच बसून राहू लागली, इकडे तिकडे उडू लागली, माझ्या खांद्यावर बसून कुडत्याचं कापड खेचू लागली. आंघोळ घाल आंघोळ घाल सांगायचं असलं की ती जोरजोरात बाही खेचते, संध्याकाळ झालेली- म्हटलं असं तू आत्ता या वेळी आंघोळ करणार? पुन्हा जोरजोरात कचकचाट करून कापड ओढलं. शेवटी नेलं तिला नळाखाली, बारीकशा धारेखाली. मनसोक्त डुंबून घेतलं. आधी हा पंख, मग तो पंख, मग मान, मग पोट... सगळं चिंब धुवून घेतलं.

मग अंग अर्धवट कोरडं करून घेतलं आणि बेडवर झपाझपा फिरत उड्या मारत राहिली, तिच्या झाडावर गेली. तिथे सर्कस-कसरती केल्या.





मग अगदी आरामात पुन्हा बॉक्समधे अंड्यावर बसायला गेली, आणि मग झोपाझोप.

दुसऱ्या दिवशी सकाळी बाहेरच येऊन बागडायला सुरुवात. अंड्याकडे पाहायलाही तयार नव्हती. बहुतेक तिला कळलं होतं- यातूनही काही निष्पन्न होणार नाही ते. मी तेही अंड काढून घेतलं. नंतर नात येणार तिला पाहायला सगळी अंडी राखून ठेवली. मग बॉक्स सोडवलं. पिंजरा साफ केला. त्याच्या खालची पिसंबिसं झाडून टाकली.

यानंतर मात्र टिटू एकदम मूडमध्ये आली. शोनशी भांडाभांडी, कसरती, भटकणं, तोंडातला घास मागून खाणं सगळे अवखळ नखरे सुरू झालेले.

मातृत्वाच्या जबाबदारीतून बिचारं पाखरूलेकरू अचानकच रिकामं झालं.

पण खूष आहे ते.

ती म्हणाली असेल...

After all, tomorrow is another day!





२०१६मध्ये आम्ही पुन्हा एक महिनाभरासाठी टिटूशोनूला सोडून अमेरिकेला गेलो. आता रंजना, राजेश आणि प्रणिता हे तिघेही त्यांचे अगदी खास मित्र झालेले असल्यामुळे त्यांना घर न बदलता अगदी छान रहाता आलं. आईबाबा जातात असे मधेमधे... त्यात काय. आपण राहू मजेत.

आम्ही सप्टेंबरमध्ये परत आलो तेव्हाही पहिल्यासारखेच लाडीगोडी करत खेळत राहिले. आता आम्ही खऱ्या अर्थाने निर्धास्त झालो.

डिसेंबरात आमच्या टिटूबाईंचं दुसरं गर्भारपण सुरू झालं. दोन दोन दिवसांआड एकेक अंडं घातलं. मागच्यावेळी सुनी अंडी आठ घातलेली. दीड महिना घालवला उबवण्यात बिचारीने- काहीच नाही निघालं. या वेळी आम्हीच आशा लावून बसलो होतो. पाहायचं काय करते बया.

मग पहिलंच एक अंडं घरट्याच्या बाहेर काचेवरच घातलं. घाई झाली असेल किंवा बावरली असेल- कळायला मार्ग नाही. पाहिलं तेव्हा ते टिचकलेलंच दिसलं. हॉस्पिटलात पोहोचण्याआधीच बाळंत होतात नाही का दुसऱ्या खेपेच्या बायका- तसंच झालं असावं.







पण मग मात्र रीतसर घरट्यात बसायला लागली.

भाजलेली सुकट, अंड्यांच्या कवचांचा चुरा, कांग,कुटु, अंड्यातलं पिवळ असा सगळा खाऊ मांडला जवळच. आंघोळीला मोठा ग्लास, प्यायच्या पाण्याला लहान वाटी असं सगळं तिच्या पंखांशीच ठेवलं...

शोनला फारशी हाकलत नव्हती या वेळी. तो मात्र पुन्हा एकदा बिचारा होऊन राखण देऊ लागला. मधूनमधून गोडगोड किलबिलणं, नाहीतर मग कितीवेळ गप्पच बसून राहू लागला. आता आम्ही काळजीवाहू सरकार.

घरात खरं राज्य तिचंच.

पहिल्या अंड्याची फजिती झाल्यानंतर मग दर दोन दिवसांनी एकेक अशा क्रमाने ७ जानेवारीपर्यंत एकूण पाच अंडी झाली. बाकीची चार होती. आणि मग नऊ तारखेला पाहिलं तर शोन आणि टिटू दोघांनी मिळून चारही अंडी फोडून टाकलेली. दोन तर बॉक्सच्या बाहेर फेकून दिलेली. काय डोकी फिरली कळत नाही...

मग नंतरचे काही दिवस टिटू त्या बॉक्समध्ये जाऊन बसायची. शोनशी भांडायची- म्हणजे शोन जबाबदार होता की काय अंडी फोडायला? माहीत नाही. दहा दिवसांपूर्वी एकदा रात्री उशीरपर्यंत जागून





एकटीच तारेवर, पिंजऱ्याच्या छतावर वेड्यावाकड्या उड्या मारत, कसरती करत खेळत बसली. शोनला चावत राहिली.

आम्ही त्याला वेगळं काढलं आणि गुडुप्प अंधार केला तेव्हाही बराच वेळ अंधारातच उड्या मारणं चाललेलं.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठली नाही. डुलक्या मारत होती. खांद्यावर बसून डुलक्या, दिव्याच्या स्टॅन्डवर बसून डुलक्या, उशीवर बसून डुलक्या.

आमचा पक्षी तज्ज्ञ ख्रिस्तोफर म्हणाला डोन्ट वरी. तिला अंड्यांची काळजी घ्यावीशी वाटतेय, पण अंडीच नाहीत. काही दिवस तिचे मूडस्विंग्ज चालतील. शी इज पीएमएसिंग. चार दिवसांत सगळं ठीक झालं. पण पुढल्या आठवड्यापासून पुन्हा बॉक्समध्ये बसून राहू लागली. एकदा उडाली आणि तिला जमिनीवरून वरच येता येईना. मग उचलून वर ठेवलं. म्हटलं हिला काय लागलंय की काय...

कसलं काय-

पाँव- नाही- पंख भारी हो गया था फिर से.

काल सकाळी बॉक्समधून बाहेरच येईना तेव्हा धनंजयने - ये टिटू, ब्रेकफास्ट करायला ये... म्हणत बॉक्समधे हलकेच हात घातला तिला





उचलण्यासाठी. तर रागात किंचितशी चावली. टिटू फक्त निषेध नोंदवण्यापुरती चावते- म्हणजे फक्त आविर्भाव असतो. चोच लागू देत नाही. पण ती बाजूला झाली म्हणून सहज शंका येऊन वाकून पाहिलं तर बाईंनी नवं अंडं घालून ठेवलेलं.

आता तो बेजबाबदार बाप्या पुन्हा काय करणार माहीत नव्हतं.

ती ही सारखी बाहेर येऊन इकडेतिकडे उनाडत होती...

अंड्यापिल्लांचं काही कौतुक नाही की आगाऊ आत्मविश्वास आलाय ते कळेलच लवकर म्हटलं. कॅल्शियम, सुकट, शिजलेला रवा, चिमटीभर मऊ अंड्याचं स्क्रँबल वगैरे खुराक चालू केला होताच. आम्ही आपली वाट पाहात होतो पिल्लं व्हावीत म्हणून.

पण ते ठीकच आहे. झाली तर झाली.

टिटू नीट राहिली म्हणजे पुरे. आमचं गुणाचं बाळ आहे ते...

मधे एक ब्रेक घेऊन टिटूने फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीला आणखी दोन अंडी घातली. आणि दोघेही अंड्यांची काळजी जरा गंभीरपणे घेऊ लागले... आणि अखेर ही अंडी सुफल होती. फेब्रुवारीच्या तिसऱ्या आठवड्यात- १९ तारखेला- पहिलं पिल्लू बाहेर आलं- शोनने सांगितलं ते मला... केवढा जल्लोष-किल्लोष केला त्याने.

आमच्या शोनू-टिटूचं पहिलं बाळ आलं हं अंडे के बाहर.

धमाल उडाली नुसती. कवचं बाजूला पडलेली दिसली आणि ओळखलं की पिलू आलं. पण टिटूबाई काही बाजूला हटायला आणि मुखदर्शन करू द्यायला तयार नव्हत्या.

शोनू नुसता वेड्यासारखा उड्या मारत आतबाहेर, तारेवर कसरत करत होता. माझ्या डोक्याभोवती उडत एक फेरी मारली.



मग मी बाळंतखोलीतून बाहेर येऊन दोन चिमटी सुकट जराशी भाजली आणि घेऊन गेले. वाटी आत ठेवल्याबरोबर शोनू जाऊन तिचं भुस्कट पाडून आला. मग मी पुन्हा पाहिलं घरट्याखोक्याचं कवाड उघडून. अजून टिटू बसूनच. शोनूही लगेच वर येऊन आत वाकून पाहू लागला. पण काही दिसेना. पण बारीकसा पिलू स्वर ऐकू येत होता.



टिटू

मग शोनूने कितीकिती लाड करावेत माझे. उड्या मारतमारत खांद्यावर येऊन न मागता खूप वेळा पापी देत राहिला.

आणि काही सेकंदांनंतर लक्षात आलं माझ्या तोंडात भाजलेली सुकट सारलेली.

तोंड गोड केलं माझं...

थोड्या वेळाने पुन्हा चक्कर मारली.

शोनूला आत प्रवेश मिळालेला. आणि टिटू जराशी बाजूला सरलेली.

त्यांचं पहिलं पिल्लू...

लालगुलाबी चुळबुळणारा इवलासा जीव- दोघं नीट पाहात होती.

आणि मलाही सहज सहभागी करून घेतलेलं.

या बाळाचे डोळे उघडे नसतात. आंधळंच असतं ते. त्याला प्रखर उजेड चालत नाही, जोराची हवा झेपत नाही. त्याला फुलासारखं जपायचं असतं.

त्यामुळे दोघांनी अजिबात सेल्फी घेतला नाही.

आता परवा-तेरवा दुसरं पिल्लू येईल. बाकीची चार ब्लँक निघाली ती काढून ठेवली बाजूला.

आता हम दो हमारे दो...

धन्य आनंद...

मग दोन दिवसांनंतर दुसरं पिल्लू बाहेर आलं. एवढेएवढेसे मांसाचे ते गोळे...

टिटूने मला जराही विरोध केला नाही. हलकेच उचलून ती मांसल मखमल हातात घेतली तर मान वाकडी करून दोघे शांतपणे बघत राहिले. महिनाभरात गुलाबी कातडीच्या त्या पातळशा जिवांवर हां हां म्हणता बारीकशी पिसं उगवत गेली. एकाचा रंग निळसर दुसऱ्याचा हिरवट आहे हे जाणवू लागलं. महिन्याची होताहोताच त्यांना छोट्याशा गवती टोपलीत ठेवलं. आता ती टोपलीतून बाहेर उड्या घेऊ लागली. किलबिलकुर्र करू लागली. ती दोन आठवड्यांची झाली तसे टिटूने साईसुट्ट्यो करून टाकला. आणि बापाकडे सोपवलं. मी खूप केलं, आता तुझी पाळी. सारा वेळ ती स्वतःचं ग्रूमिंग करत रहायची, खेळत रहायची. दिवसातून दोनतीन वेळा पिल्लांकडे चक्कर टाकत असे ती केवळ शोन आपलं काम नीट करतो आहे की नाही एवढंच पाहायला... नंतरचे दोन-तीन आठवडे शोनच सारं करत राहिला. त्यांची माता तीन आठवड्यांनंतर ढुंकूनही बघेनाशी



झाली.पिताश्री शोनमहाराज अजून भरवतात, लाड करतात, कधी मारतातही. पोरं सतत बापाच्या भोवतीभोवतीच असत.

एप्रिल महिन्यांपर्यंत पोरांना अगदी साजरं रंगरूप आलं. आईवडिलांच्या प्रतिकृतीच-

चीनी आणि नीनी. चिनी निळा बाबांसारखा- फक्त पाठीवर काळे खवले आईसारखे. आणि नीनी थेट आईसारखा. नरमादी कोणती कळायला वेळ होता.

आता सगळेजण मिळून टेबलवर नाश्ता करायला येत. पोरांची नुसती गडबड चाले. टेबलवर खाली गडगडू नयेत म्हणून आमची गडबड.

आणि मग- २७ मे २०१७ला शोनू उडून गेला...

नेहमीप्रमाणे नाश्ता करताना बाहेर आणलेलं टिटूकुटुंब टेबलवर चरत होतं. आणि मी गेले किचनमध्ये. तापलेल्या तेलावर लसूण चरचरला होता आणि त्यात गवारीचा ढीग टाकल्यावर चर्रर्र आवाज झाला.

त्या आवाजाने पाखरं केवढीतरी दचकली आणि उडत थेट किचनमध्ये आली.







वारा होता. पडदा वाऱ्यात फडफडत बाहेर गेलेला. आणि त्यामुळे फट पडलेली. आमचा शोनू उडाला बाहेर. आणि टिटूबाई काय करावं न सुचून खिडकीच्या लेजवर बसून राहिल्या.

गेला. शोन गेला.

खाली जाऊन सगळेजण शोधाशोध करू लागले. भोवतीच्या इमारतींत लहानसहान बगिचांचे कोपरे, झाडं आहेत. सगळीकडे आमची पाच माणसं भिरभिर शोधू लागली.

अर्धातास वीस मिनिटं शोधलं. कावळे तर भरपूर होते. तीन कावळे झेपावत होते तिथे पाहिलं.

हाकारे सुरू होते.

शेवटी माझं अवसान गेलं. मी तो आता कुठल्यातरी कावळ्याच्या पोटात गेल्याचं मान्य केलं. आणि बसले रडत बाथरूममधे.

पाच मिनिटांनी धनंजयचा आवाज आला- आला? कुठे होता...

विश्वासच बसेना... पण मागच्या सप्टेंबरमध्येही महाराज उडून गेलेले आणि झाडात दबकून बसलेले सापडलेले.


टिटू

आजही शोनू परत आलेला. शोनूचं नशीब जोरावरच... त्याला पलिकडल्या इमारतीच्या वॉचमनने भिंतीजवळ घाबरून बसलेला पाहिला. आणि कावळे पोहोचायच्या आत तिथे पोहोचून त्यांच्याकडे असलेल्या बॉक्समधे टाकलं. पाणी ठेवलं. आमच्या रंजना-प्रणिता त्याला शोधताना पाहिलं त्याने. विचारून घेतलं- काय झालं- काय शोधताय... त्यांनी सांगितलं कर्णिकांचा निळा पक्षी उडालाय तो शोधतोय. त्यांना काही न बोलता सावकाशीने तो शोनूला घेऊन वर आला. बक्षिसी हवी होती. ती तर आनंदानेच दिली... येडं शोनू आलं नि लगेच दांडीवर झोपून गेलं. ते संध्याकाळपर्यंत डुलक्या मारत होतं. मग माझ्या खांद्यावर बसून, बाबाच्या कॉलरवर बसून सारं काही ठीक असल्याची द्वाही फिरवली. टिटूला कशाचाच पत्ता नव्हता- शोनू दुनिया देख के आया हूँ च्या तोऱ्यात असल्यासारखा वाटला...

आता कानाला खडा. किचनचं दार बंद करूनच घ्यायचं.

उडालेला पक्षी असा क्वचितच सापडतो परत...

शोनू त्यातलाच एक- आम्ही भाग्यवंत.

आमचं लाडकं बाळ.



पण आणखी एक धक्का बसायचा होता. मी ऑफिसला जाताना दोन महिन्यांच्या या दोन्ही पिल्लांना आमच्या बेडरूममधे एका सोफाचेअरवर ठेवलं. पण धडपड करत चिनी आणि निनी खालीच झेपावले. वर उचलून ठेवलं. पण निनी जरा मंदच झाला. त्या दोघांत तो जास्त गुटगुटीत होता. जास्त दांडगाई करायचा. अगदीच शांत झाला... आणि मग एक दिवसात पुन्हा धडपडला. बहुतेक छातीच फुटली त्याची. नाकपुडीतून रक्त आलं आणि निनी शांतच झाला.

चिनी एकटाच राहिला... त्याचाही पाय थोडासा दुखावला असावा. नंतरही तो पाय ओढतच चालायचा. पण उडण्यात मात्र पटाईत. भराभर झेपावायचा सर्वत्र.

आंघोळ करायला आईच्या सोबतीने उतरायचा. तिच्या इतकीच दिलखुलास आंघोळ चालायची. आम्ही शोनू म्हणायचो, घाणेरड्या शोनू, बघ, ते इतकं छोटं बाळ कसं स्वतःहून मस्त आंघोळ करतं. नाहीतर तू.

चिनूबाळ कधीच चावायचं नाही. आणि गाणं गुणगुणलेलं खूप आवडायचं. सारखं बाबाच्या मागेमागे फिरायचं. आई डाफरते हे माहीत होतं त्याला.

याच वर्षात  जुलैमध्ये टिटूने आणखी एक वीण दिलं. सहा अंडी घातली. त्याआधीच ती भारी अशक्त वाटत होती. उडणं जरा बंदच झालेलं. त्यात हे बाळंतपण.





टिटूच्या सहा अंड्यांतली पाच कोरी निघाली. जीव न धरलेली. प्रखर दिव्याच्या समोर धरलं की कळलं ते. मला तज्ज्ञ मित्राने सांगितलेलं की कोरी अंडी काढून टाका. म्हणजे ती नीट फळलेल्या अंड्यावरच बसेल आणि अजून घालायची तर घालून टाकेल. ती पाच कोरी अंडी काढून घेतली. त्यानंतर तीन दिवस टिटू अगदी व्यवस्थित अंडं उबवत होती. मग तिने आणखी एक अंड घातलं. म्हटलं ही आठ अंड्यांचा कोटा पुरा करणार वाटतं. आणि मग पंधरा दिवसांपूर्वी शनिवारी सकाळी पाहिलं तर बयाने दोन्ही अंडी खोक्यातून काढून पिंजऱ्यात लोटून दिलेली. मी झटकन अंडी उचलून घेतली. एक नुसतच फुटलेलं आणि दुसऱ्याची एक कपची फुटलेली आणि आतलं पिल्लू बारीक कूंकूं आवाज करीत होतं. डोळे मिटलेले... पण आवाज स्पष्ट होता.एका बाजूने किंचित रक्त आलेलं. हादरले मी. टिटूला दाखवलं. शोनूला दाखवलं...

ते बघत राहिले. ते पिल्लू वाचेल असं वाटलं नव्हतंच. पण धनंजय म्हणाला तरीही कापसावर ठेवून देऊ. थोडा कापूस ठेवून अंडंपिलू खोक्यात ठेवलं.

बसली होती ती आत जाऊन. पण मला बघवेना. काहीही मदत करू शकत नसताना... काय थांबून रहायचं.



संध्याकाळी आले... कापसासकट अर्धा इंचाचं पिलाचं शरीर टिटून पुन्हा बाहेर टाकून दिलेलं. बॉक्स स्वच्छ करून टाकलेला. शोनू तिच्यावर ओरडत होता. ती स्वतःत मग्न होती. भारी वाईट वाटलं. लिहितानाही वाईटच वाटतंय.

पण या निमित्ताने बर्डब्रेन्ड असं मठ्ठ माणसांना का म्हटलं जातं ते कळलं.

टिटूवर खूप रागवले. तीन दिवस तिला घेतलं नाही बोटावर. पण तिच्या काही गावीच नव्हतं.

प्राणीपक्षी न-नैतिक असतात म्हणतात. नैतिकतेची संकल्पनाच नसते. हार्मोन्सची पुडकीच असतात ती...

ती बघत होती, ही बया आपल्याला घेत का नाही. मग जबरदस्तीनेच उडून आली माझ्या खांद्यावर. आता या हार्मोन्सच्या पुडीवर रागवायचं तरी कसं नि नैतिकतेच्या पलिकडे असलेल्या जीवाला शिकवायचं तरी काय...

मित्राने सांगितलं, की ही पाखरं करतात असं. तिला कंटाळा आला किंवा हार्मोन्स बदलले.

पाखरांच्या माद्या दोनअडीच आठवडे पिलांकडे बघतात, त्यांचं अटीतटीने रक्षणही करतात. मग एकदा मोठं झालं की नर त्यांना भरवतो,





बघतो. माद्या आपण त्या गावच्च्याच नसल्यासारख्या दुरून बघतात. गेल्या बाळंतपणात हे सारं टिटूबाबत, शोनूबाबत पाहिलं होतं.

आता हा नवा अनुभव... मठ्ठ पक्षीण.

अजून महिनाभरात नव्या तयारीला लागेल बया...

निसर्गक्रम. बस्स.

त्या वर्षी आम्ही ऑगस्टमध्ये वीस दिवसांसाठी लेकीकडे गेलो. इकडे पावसाने धुमाकूळ घातला. आणि पाखरं ज्या खोलीत होती, त्या खोलीचं फॉल्स सीलिंग रात्री कधीतरी खाली आलं. सकाळी रंजना घरी आली तेव्हा पाहिलं... पण पाखरं सुरक्षित होती. आणि खेळतही होती.

२०१८च्या जानेवारीत आमच्या टिटूराणी पुन्हा अंड्यावर बसल्या. पाच नीटपणे बॉक्समधे घातली. पण शेवटची तीन अंडी तिने खिडकीवर, पिंजऱ्यावर, एक खाली जमिनीवर घालून टाकली होती. तिने ठरवलेलं आता बास... पण बाकीची अंडी नीट उबवू लागली.

ती जराशी खायला, नाहीतर बराच वेळ अडवून धरलेली शी करायला बाहेर आली की मिनिटभरातच शोनू महाराजांची फडफड धडपड सुरू होत होती. आता तो एकदम तज्ज्ञ बाप झालेला. तिने काय करावं, काय करू नये सगळं त्याला कळत होतं. तिने अंड्यांकडे परत जावं म्हणून किचकिचाट करायचा. तिला चोचून, टोचून, कोकलून खाण्यापासून दूर करू पाहायचा. तीही कचकचा अंगावर ओरडायची.




धमकावायची. हवं तितकं खाल्ल्याशिवाय मुळीच हलत नसे. त्यांचं पहिलं बाळ निनू (नर) चमत्कारून पाहात रहायचं. तेही च्युक च्युक करायचं. मग अखेर संथपणे टिटू अंड्यांकडे जायला निघायची.

त्यांचा हा संवाद-

शोनू- ए, जा ना आता आत. कितीवेळ चेंगटपणे खात बसली आहेस. तरी बरं भरवतो ना मी आत येऊन तुला?

टिटू- ए, तू जा रे. खाऊ दे शांतपणे. तू काय भरवतोस. ही इतकी चांगली कुरकुरीत भाजलेली सुकट तू नुसता चोथा करून देतोस. काय मजा त्यात. आईने खास माझ्यासाठी केलेली आहे ती. खाऊ दे मला. तुलाच कळतं काय?

शोनू- खादाड भवाने, अंड्यातल्या पिल्लांना थंडी लागेल म्हणून कोकलतोय. थंडी किती पडलीय. जा लवकर. वेडी कुठली. मग तूच बसशील रडत.

टिटू- जातेजाते. काय इथेच बसून रहाणार आहे का मी? सरक बाजूला. जाऊ दे. झालं माझं.

शोनू तिच्या मागेमागे अंड्यांच्या खोक्यापर्यंत जातो.

टिटू- कशाला मागेमागे? येतं मला जाता.


टिटू

शोनू- अगं, तुझा तोल जातो चालताना, म्हणून येतो. बारीकशी उडीही मारता येत नाहीये तुला.

टिटू- नीट धडवाणं खाऊ देऊ नकोस- आणि म्हणे तोल जातो. जा आता. तो बघ, निनू आत यायला निघालाय. थांबव त्याला. नाहीतर शिरेल आत नि फोडेल अंडी. जा त्याला गोष्टीबिष्टी सांग. आत नको येऊ देऊ.

शोनू- जातो. येडं पोर आहे ते. काही कळत नाही.

टिटू- तुझ्यावरच पडलंय. रंगही तस्साच नि गुणही. आणि हळू बोला. मला जरा डुलकी घेऊ दे बसल्याबसल्या.

---

हे असले संवाद अजून किमान महिनाभर चालणार. निनूला आता कंटाळा आलाय. आईबाबा दोघेही फारच बिझी. सारखे कटवत असतात मला. सारखा सांगायचा मला. निनू अगदी बोलतच असे. खांद्यावर किंवा हातात आला की अगदी चेहऱ्याकडे बघून ट्विटट्विट करत राही. चोच घासून काहीतरी सांगत राही. आंघोळ करतानाही त्याची बडबड चाले. टिटू इतकी मत्सरी होती की तिच्या बाळाचेही फार लाड केलेले तिला आवडत नसत. आणि ती तर मुळीच लाड करत नसे. सगळी भर शोन काढत असे. त्याचं पालकत्व पाहात रहावं असं. तो चोचीने त्याची पिसं




विंचरून देत असे. गरज नसताना भरवत असे. डोक्याला खाजवून देत असे. हे केवळ हार्मोन्सचं पुडकं असल्यासारखं वर्तन नसे.

पण या विणातही टिटूची अंडी कोरीच निघाली.

२०१८च्या डिसेंबरमध्ये आम्ही पोरांसोबत वार्षिक फिरतीवर गेलो. पंचवीस डिसेंबरला पहाटेच पाखरांना बाय म्हटलं... शहाण्यासारखं रहा म्हटलं... पंधरा दिवसांसाठीच चाललो होतो. काहीच टेन्शन नव्हतं.

नऊ जानेवारीला परतलो. तेव्हा घरात आल्यावर पंधरा मिनिटांत अमृताने सांगितलं- आई, जरा बस...

काय झालं? काहीतरी वाईट बातमी सांगायची असणार हे कळलं...

आई... टिटू परवा म्हणजे ७ जानेवारीला अचानक मरून गेली...

रंजना घरात आली तेव्हा सकाळी तिला मरून पडलेली दिसली. शोनू ओरडत होता...

माझा आक्रोश कितीतरी वेळ चालला. धनंजयचा निःशब्द.

मी मात्र हंबरडा फोडूनफोडून रडले...

टिटू सप्टेंबर २०१४मध्ये जन्मली, ऑक्टोबरमध्ये आमच्या ओटीत आली. आमची लेक झाली.





ध्यानीमनी नसताना... आम्ही बाहेरगावी असताना...

तो पानांवर पडलेल्या उन्हाचा तुरा मिटून गेला

.

तिच्या वेदनेची एक कळही आमच्यापर्यंत पोहोचली नाही...

निघताना तिला नीट रहा हं सांगून बाहेर पडलेलो.

बस्स.

नीट नाही राहिली.

ऐकतच नसे कधी... हट्टी पाखरू.

तिला रंजनाने एका कुंडीत झोपवलेलं.

मी ती कुणाचं न ऐकता उकरली. तिचा निष्प्राण देह हातात घेऊन वेड्यासारखी बोलत राहिले. सरला सारा विवेक माझा. उरला कल्लोळ.

त्या पिंजऱ्यामुळे होणारी आठवण नको म्हणून ते दोन पिंजरे काढून टाकले मी. एक मोठा पिंजरा आणला. शोनू आणि निनूची एकमेकांना सोबत होती...





पण दोनच महिन्यांत त्या पिंजऱ्याच्या दारात मस्ती करताना निनूच्या अंगावर पिंजऱ्याचं दार मिटलं. आणि निनू त्यात सापडला. लागलं नव्हतं. पण घाबरूनच गेलं ते पाखरू... धनंजयच्या तळहातातून माझ्या तळहातात येतायेता त्याचा अखेरचा श्वास संपला...

शोन माझा एकटा झाला.

सहा महिन्यांनंतर त्याच्या सोबतीसाठी तीन बजीज् आणले. पण त्यांचं माझं फारसं जुळलं नाही. शोनूची सोय पाहिली इतकंच.

आता शोनूलाही दूर पाठवून दिलंय.

टिटूची आठवण अशीही सोबत आहेच.


टिटू

*एक लहानमोठीशी पोकळी मनात*

*मनातून घरात*

*घरातून मनात*

*उडत भिरभिरत रहाते आहे.*

*तिला रंग आहे हिरवा-पिवळा*

*दोन निळेशार ठिपके आहेत*

*आणि डोळ्याची काळी मोहरी*

*माझ्यावर रोखलेली.*

*तू कुठे गेली होतीस...*

*मी खूप सोसलं गं*

*काय होतं कळत नव्हतं.*

*तू असतीस तर कदाचित*

*कदाचितच*

*कमी वेदना झाल्या असत्या*



टिटू

*मी झोक जाऊन खाली पडले*

*तरी तुझी हाकच नाही आली...*

*टिटू... काय करते बाळा, खाली कशाला फिरतेस...*

*म्हणायला तू आलीस नाहीस*

*शोन एकटाच ओरडत राहिला.*

*पण तू आणि बाबा आलासुद्धा नाहीत*

*कुठे गेला होतात गं...*

*मला कळलंच नाही मी पोकळीत कशी शिरले...*

*पण आता इथेच राहीन पोकळीसह भिरभिरत.*

*चालेल ना तुम्हाला?*

*उन्हाच्या तुऱ्याला पानं फुटल्यासारखी*

*ती पोकळी आता सतत मनात असेल*

*मनातून घरात*

*घरातून मनात.*





**या नंतर कधीही कोणा पाखराला जीव लावायला घरात आणणार नाही...**

**पाखरालाच काय कुठल्याच मुक्या प्राण्याला नाही...**

**प्रेम गोड वाटतं.**

**आणि नंतर सोसेनासं होतं हा धडा टिटूने ओला ओला गिरवून घेतला.**

**तिचे फोटो आणि या आठवणी पुरेशा आहेत.**

